# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

माहितीचा अधिकार

**क्रमांक-तक्रार-११०/२०२५** दिनांक :- २२ जाने., २०२६

१. श्री. गजानन विश्वनाथ राठोड,
रा. द्वारा देवरावजी आकरे १९,
गुरुदेव नगर हुडकेश्वर रोड, नागपूर-४४००२४. -- **तक्रारदार**

२. जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक (प्र.),
नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर,
लोटस प्लाझा, प्लॉट नं. १, २ पहिला माळा,
व्हि. सी. ए. ग्राऊंडच्या बाजूला, नागपूर-४४०००१ --**जन माहिती अधिकारी**

३. प्रथम अपिलीय अधिकारी, जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर
लोटस प्लाझा, प्लॉट नं. १, २ पहिला माळा,
व्हि. सी. ए. ग्राऊंडच्या बाजूला, नागपूर-४४०००१ -- **प्रथम अपिलीय अधिकारी**

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ नुसार आयोगास दिनांक १०.०३.२०२५ चा (प्राप्त दि. १०.०३.२०२५) थेट तक्रार अर्ज सादर केला आहे. या तक्रार अर्जामध्ये तक्रारदार यांनी "जन माहिती अधिकारी, नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षम मंडळ नागपूर यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती पोष्टाद्वारे पाठविलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या विहित मुदतीत दखल घेवून आदेश पारीत केलेले नाही" असे कारण नमूद करुन थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित झालेल्या अर्जदारास दाद मागण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९ (१) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीला कलम ७ चे पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) चा खंड (क) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत निर्णय प्राप्त झाला नसेल, किंवा यथस्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने जी व्यक्ती व्यथित झालेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशी मुदत संपल्यापासून किंवा असा निर्णय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांमधील यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(६) अन्वये पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये केलेले अपील, ते मिळाल्याच्या दिनांकापासून यथास्थिती तीस दिवसांच्या आत किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण पंचेचाळीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, कारणे लेखी नमूद करुन, निकालात काढण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९(३) अन्वये पोटकलम (१) खालील निर्णया विरुध्दचे दुसरे अपील, ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी Chief Information Commissioner -Vs- State of Manipur (AIR २०१२ SC ८६४), यामध्ये सिव्हिल अपील क्रमांक १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर, दिनांक १२.१२.२०११ रोजी दिलेल्या

आदेशामध्ये – The nature of the power under Section १८ is supervisory in character whereas the procedure under Section १९ is an appellate procedure and a person who is aggrieved by refusal in receiving the information which he has sought for can only seek redress in the manner provided in the stature, namely, by following the procedure under Section १९. This Court is, therefore, of the opinion that Section ७ read with Section १९ provides a complete statutory mechanism to a person who is aggrieved by refusal to receive information. Such person has to get the information by following the aforesaid statutory provisions." असे स्पष्ट केले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश (Judgment) लक्षात घेता असे स्पष्ट होते की, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ मधील तरतुदीनुसार केलेल्या तक्रारी ऐवजी कलम ६ अंतर्गत केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने व्यथीत झाल्यास, कलम १९ (१) नुसार प्रथम अपील व कलम १९(१) वरील निर्णय मान्य नसेल तर कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल करणे क्रमप्राप्त ठरते.

तसेच ज्या माहिती अर्जाच्या संदर्भात कलम १९ (३) अन्वये आयोगास व्दितीय अपील सादर करण्यात आले आहे व ज्या अपील प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशा प्रकरणी तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता आयोगास असे निदर्शनास आले आहे की, तक्रारदार यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम ६(१) अंतर्गत दिनांक ३०.१२.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी, नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर केले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर यांनी दिनांक १४.०१.२०२५ च्या पत्रान्वये तक्रारकर्त्यास एकुण २० पानांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर तक्रारदार यांनी "जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती पाठविली आहे" असे कारण नमुद करुन कलम १९ (१) अन्वये दिनांक ०४.०२.२०२५ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी, नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षम मंडळ, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९.०३.२०२५ रोजी सुनावणी घेवून "राज्य जन माहिती अधिकारी तथा गैरअर्जदाराने केलेले कथन तसेच सादर केलेले पुरावे यावरुन अर्जदाराने मागविलेली माहिती त्यांना पुरविण्यात आलेली आहे, याबाबत माझे समाधान झालेले आहे. तसेच अपिलकर्त्यास माझे समोर प्रत्यक्ष उपस्थित होवून कोणताही खुलासा पुरावा सादर करावयाचा नाही. केवळ कार्यालयीन शिष्टचारांचा भंग करावयाचा आहे. अपिलकर्त्याचे दिनांक १४.०१.२०२५ चे प्रथम अपील फेटाळण्यात येत आहे" असे नमुद करुन आदेश पारीत केले. तद्नंतर तक्रारदार यांनी "जन माहिती अधिकारी, नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षम मंडळ नागपूर यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती पोष्टाद्वारे पाठविलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या विहित मुदतीत दखल घेवून आदेश पारीत केलेले नाही." असे कारण नमूद करुन आयोगाकडे कलम १८ (१) अन्वये थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार यांची कलम १९(३) अंतर्गत कार्यप्रणालीचा अवलंब न करता अशा पध्दतीने तक्रार दाखल करण्याची कृती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विसंगत ठरते.

तथापि, तक्रारकर्ता यांच्या दिनांक १०.०३.२०२५ रोजीच्या (प्राप्त दिनांक १०.०३.२०२५) थेट तक्रार अर्जान्वये आयोगाने जन माहिती अधिकारी, नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ नागपूर व प्रथम अपिलीय अधिकारी, नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षम मंडळ, नागपूर यांना पत्र क्र. रामाआ/त.क्र.११०/२०२५/तक्रार शाखा/२०९१, दिनांक ०६.०५.२०२५ अन्वये तक्रारदार यांच्या दिनांक ३०.१२.२०२४ रोजीच्या माहिती अर्ज व दिनांक ०४.०२.२०२५ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी तथा निरिक्षक, नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षम मंडळ, नागपूर यांनी दिनांक ०५.०६.२०२५ च्या पत्रान्वये (प्राप्त दिनांक ०५.०६.२०२५) आयोगास अहवाल सादर करुन त्यामध्ये "तक्रारदारांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी, नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षम मंडळ, नागपूर यांनी दिनांक १४.०१.२०२५ अवये आवश्यक माहिती व दस्ताऐवज यांच्या साक्षांकित छाया प्रतीसह पुरविण्यात आलेली आहे. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अनुषंगाने तक्रारदाराचे समाधान न झाल्याने त्यांनी या प्रकरणात प्रथम अपील दिनांक ०५.०२.२०२५ रोजी दाखल केलेले होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांचेकडून तक्रारदारास देण्यात आलेल्या

माहितीचे अवलोकन केले असता कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदाराला आवश्यक दस्ताऐवजासह दिलेली आहे. याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांचे समाधान झालेले आहे.

अपिलकर्ता सुनावणीचे तारखेला कार्यालयात हजर झालेले होते. परंतु सुनावणी करीता प्रथम अपिलीय अधिकारी यांचे समक्ष उपस्थित न होता त्यांचे लेखी निवेदन आवक जावक विभागात दिलेले आहे. सदर माहिती प्रत्यक्ष अधिकाऱ्यांना भेटून त्यांना सादर करावी, असे शाखेशी कर्मचाऱ्याने अपिलकर्त्यास सांगितले असता त्यांनी कर्मचाऱ्यासोबत वादविवाद करणे असे गैरवर्तन केलेले आहे.

अपिलकर्त्याला पुरेपूर संधी देऊन देखील त्यांनी अपिलीय अधिकाऱ्यासमोर उपस्थित होवून त्यांची बाजू समजावून सांगितली नाही किंवा त्यांना कोणतीही माहिती अर्धवट, चुकीची, मानसिक त्रास देणार आहे, याबाबत खुलासा केलेला नाही. याउलट अपिलार्थीने मंडळाच्या कर्मचाऱ्यांना वेठीस धरणे तसेच अपिलीय अधिकारी यांचेवर देखील मौखिकरित्या दबाव आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारास पुरविलेल्या माहितीबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांचे समाधान झालेले होते व अपिलकर्ता त्यांचे समोर उपस्थित झालेला नव्हता व अपिलकर्त्याने सादर केलेल्या लेखी बयानातील मुद्दे देखील रितसर नसल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रकरण फेटाळून तसा आदेश क्र. नाजिसुरम-नाग/प्र.अ./१२७८/२०२५, दि. २६.०३.२०२५ पारीत केलेला आहे. (नि.क्र. ३) सोबत प्रत संलग्न सदर आदेशाची प्रत अपिलकर्त्यास पोस्टाद्वारे पाठविण्यात अलेली आहे.

या मंडळाचे राज्य जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली माहिती समाधानकारक असून अपिलकर्त्याने सुनावणीचे वेळी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांसमोर प्रत्यक्ष उपस्थित होऊन त्यांची बाजू सक्षमरित्या मांडण्याची दक्षता घेतलेली नाही. याउलट मंडळातील कर्मचारी व अधिकारी यांचेशी गैरवर्तन करणे असे प्रकार केलेले आहे. तरीही वरील सर्व परिस्थितीचे सखोल अवलोकन करुन अपिलकर्त्याचे द्वितीय अपील फेटाळण्यात यावे, ही नम्र प्रार्थना" असे नमुद केले.

सबब, जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर यांनी जोडपत्र-अ च्या अनुषंगाने दिनांक १४.०१.२०२५ च्या पत्रान्वये तक्रारकर्त्यास माहिती पुरविलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेवून दिनांक २६.०३.२०२५ रोजी आदेश पारीत केलेला आहे. त्यामुळे सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमानुसार कार्यवाही केलेली असल्याने पुढील कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही. सबब, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अंतर्गत केलेली थेट तक्रार निकाली काढणे आवश्यक ठरते. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक:** २२.०१.२०२६

जा.क्र.-6102-दि.------------
03 FEB 2026

E:\k \तक्रारशाखा\थेट तक्रार आदेश –बनकर